# ‘आपला तो बाब्या’

“लागलं माझ्या बाळाला? फार द्वाड आहेत ती कारटी!”

आपसांत मारामारी करून मुलं आयांकडे गेली होती. प्रत्येक आई आपल्या बाळाला गोंजारत हेच म्हणत होती. बाकीची मुलं उपद्व्यापी आणि आपलं मूल तेवढं सद्‌गुणांचा पुतळा असल्याचा प्रत्येकीचा दावा होता.

माणसाची निष्ठा आधी स्वतःवर, मग आपल्या जिवलगांवर, मग कुटुंबावर, मग प्रांतावर, मग देशावर, मग जगावर अशी उतरत्या भाजणीने अधिक बाहेरच्या वर्तुळांत विस्तारत जाते. त्यामुळे त्याच्या सर्वात जवळचं ते सर्वोत्कृष्ट असतं. त्यावेळी तो आपल्याला ज्या वर्तुळाचा भाग समजत असतो त्या वर्तुळाच्या आतलं ते सारं उत्तम आणि त्याच्या बाहेरचं जग परकं म्हणून तिथलं सगळं निकृष्ट ठरवलं जातं. ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. प्रत्येक आईला तिचं मूल सर्वात जवळचं वाटतं. त्याच्यात ती स्वतःचं प्रतिबिंबच बघत असते. म्हणून तिला त्याच्यातले दुर्गुण दिसत नाहीत. दुसऱ्यांची मुलं परकी. म्हणून स्वाभाविकच दूरून त्यांच्यातल्या दोषांची सारी कुसळं तिला मुसळप्राय दिसतात. ती आपल्या मुलाचं जे संगोपन करते त्या तोडीचं पालनपोषण दुसऱ्या कुणाही बाईला जमणं शक्यच वाटत नाही.
“राजूची आई डब्यात ढोकळा देते मुलाला! इडलीसारखं जरा पौष्टिक काही द्यावं ना!”
“हेमेनची आई हॅमबर्गर देते! कसलं जंक फूड! मी रवीला साजूक तुपातल्या खव्या-नारळाच्या करंज्या दिल्यायत!”

इडलीत आणि ढोकळ्यात पोषणतत्त्वं सारखीच. हॅमबर्गरमध्ये लज्जारक्षणार्थ एक सॅलडचं पान असतं. बाकी कॅलरीज, कोलेस्टेरॉल वगैरे बाबतीत त्याच्यात आणि खव्या-नारळाच्या करंजीत काही फरक नाही. तरी प्रत्येकीला फक्त आपलाच जिन्नस पौष्टिक आणि दुसरीचा हिणकस वाटतो.

याचाच विस्तारित प्रकार म्हणजे आपल्या देशातल्या चालीरीती इतर देशांतल्या पध्दतींहून श्रेष्ठ समजणं. प्रातर्विधी उरकल्यावर पाश्चात्य लोक कागद वापरतात, भारतीयांचं शुध्दीकरण पाण्याशिवाय होत नाही. पाश्चात्यांना प्रक्षालनाची किळस येते; भारतीयांना ‘ड्रायक्लीनिंग’ची घाण वाटते. प्रत्यक्षात व्यवस्थित केली तर दोन्ही पध्दतींनी उत्तम सफाई होते. नीट केली नाही तर कुठल्याही प्रकारात अस्वच्छता रहातेच. तरी प्रत्येकाला आपलं ते सोवळं वाटतं, परप्रथा ओंगळ वाटते.

आत्तापर्यंत स्वदेशातले ‘आपण’ आणि परदेशातले ‘ते’ यांच्यात एक अभेद्य लक्ष्मणरेषा आखून वागणं जमत होतं. आता जग अधिकाधिक जवळ येतं आहे. नोकरीधंद्याच्या निमित्ताने वेगवेगळया दूरच्या देशांत भटकणं, तिथे वर्षानुवर्षं रहाणं अपरिहार्य होतं आहे. तिथे जाऊन आपल्याच संस्कृतीच्या चष्म्यातून पाहिलं तर सगळं धुरकट दिसतं; जागोजागी परकेपणाच्या ठेचा लागतात. म्हणून जिथे जाऊ तिथल्या चष्म्यातून पहायला शिकूया. मग सारं स्वच्छ आणि बिनचूक दिसेल. तिथल्या रीतीभाती समजून घेता येतील; आपल्याशा करता येतील. त्यायोगे आपल्या छोट्या वर्तुळाचा परिघ रुंदावत जाईल आणि त्या विस्तारित वर्तुळात साऱ्या पृथ्वीचा गोल सामावेल. सारं विश्व आपलंच घर बनेल.

डॉ. उज्ज्वला दळवी
-ujjwalahd9@gmail.com

**(‘esakal’ च्या सौजन्याने)**